आकाशवाणी, पुणे
राष्ट्रीय बातमीपत्र
दि- 03.03.2021 सकाळी 9 वा. 20 मि. वार- बुधवार

ठळक बातम्या

- महाराष्ट्र आणि केरळ या दोनच राज्यात कोरोनाचे सर्वाधिक उपचाराखालील रुग्ण
- 60 वर्षे आणि 45 ते 59 वर्षे वयोगटातील अन्य आजार असलेल्या 2 लाखांहून अधिक लोकांचे लसीकरण पूर्ण
- दूरसंचार तरंग अर्थात स्पेक्ट्रमचे 77,814 कोटीहून अधिक रुपयांचे लिलाव
- हरियाणात स्थानिक नागरिकांना खासगी नोकऱ्यांमध्ये 75 टक्के आरक्षण देणाऱ्या कायद्यावर शिक्कामोर्तब
- पूर्व चीनी समुद्रात असलेली सेन्काकू बेटे हा चीनचाच भूभाग असल्याचा चीनचा दावा जपानने फेटाळला

**<u>देश-कोविड आकडेवारी</u>**

देशभरातील आतापर्यंतच्या एकंदर कोरोना बाधितांपैकी सध्या 1.51टक्के रुग्ण उपचार घेत आहेत असे, केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने काल प्रकाशित केलेल्या आकडेवारीत म्हटले आहे. देशाचा कोविड-19 मधून रुग्ण बरे होण्याचा दर आता 97 टक्के झाला आहे. महाराष्ट्र आणि केरळ या दोनच राज्यात 40 हजारांहून अधिक उपचाराधीन रुग्ण असून, देशाच्या तुलनेत ही टक्केवारी 75 टक्के आहे, अशी माहिती आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी काल नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

महाराष्ट्र, तमिळनाडू, पंजाब आणि गुजरात या राज्यातील वाढत्या रुग्ण संख्येला आळा घालण्यासाठी मदत म्हणून या राज्यात केंद्रीय पथके पाठवण्यात आली आहेत, असे भूषण यांनी सांगितले. गेल्या दोन आठवड्यात नव्याने बाधित होणाऱ्या दैनंदिन रुग्ण संख्येत किरकोळ वाढ झाल्याचे ते म्हणाले. देशभरात सध्या 1 लाख 68,358 रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

काल दुपारी एक वाजेपर्यंत देशभरात 1 कोटी 48 लाखांहून अधिक जणांना कोविड प्रतिबंधात्मक लस देण्यात आली असल्याचे भूषण यांनी सांगितले. यापैकी 2 लाखांहून अधिक रुग्ण 60 वर्षे वयावरील आणि 45 ते 59 वयोगटातील अन्य आजार असलेले आहेत. नऊ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 100 टक्के अथवा 90 टक्क्यांहून जास्त नोंदणीकृत आरोग्य कर्मचाऱ्यांना लशीची पहिली मात्रा देण्यात आली आहे.

**<u>स्पेक्ट्रम लिलाव</u>**

दूरसंचार तरंग अर्थात स्पेक्ट्रमचे एकंदर 77,814 कोटी 80 लाख रुपयांचे लिलाव काल अखेर पूर्ण झाले. दूरसंचार सचिव अंशू प्रकाश यांनी लिलावात बोली लावल्या गेलेल्या तरंग लांबीची माहिती दिली. भारती एअरटेल, वोडाफोन आयडिया आणि रिलायन्स जिओ इन्फोकॉम या कंपन्यांनी लिलावात भाग घेतला. लिलाव बंद झाला असून लवकरच वाटपासंबंधी निर्णय घेण्यात येईल, असे प्रकाश यांनी सांगितले.

**<u>मुक्त विद्यालय – पुस्तकं</u>**

राष्ट्रीय मुक्त विद्यालय अर्थात NIOS साठी भारतीय परंपरांविषयीच्या अभ्यास पुस्तिकेचे काल शिक्षणमंत्री रमेश पोख्रीयाल निशंक यांनी नॉयडामध्ये प्रकाशन केले. भारतीय संस्कृतीचा प्रचार मुक्त विद्यालयांच्या अभ्यासक्रमातून केला जात आहे, असे निशंक यांनी यावेळी सांगितले. संस्कृत भाषा, व्याकरण, वेद, भारतीय तत्वज्ञान याविषयीचीच्या पुस्तकांचा लवकरच विविध परदेशी भाषांमध्ये त्याचा अनुवाद केला जाईल, असेही निशंक म्हणाले.

**<u>महाराष्ट्र विधिमंडळ</u>**

महाराष्ट्र विधी मंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात काल दुसऱ्या दिवशी राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या आभारदर्शक प्रस्तावावरच्या चर्चेला सुरुवात झाली. शेतकऱ्यांचे कृषीपंप आणि वीज ग्राहकांच्या थकबाकीसंदर्भात विधीमंडळात चर्चा होऊन निर्णय होईपर्यंत कुणाचीही वीज जोडणी कापू नये, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. विधानसभेत प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून वीजेवर चर्चा घेण्याचा आग्रह विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी धरला. त्यावर वीज थकबाकी संदर्भात विशेष बैठक आयोजित करुन चर्चा करण्याची सरकारची तयारी असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**<u>पंतप्रधान – आत्मनिर्भर भारत</u>**

आत्मनिर्भर भारतासाठी शिक्षण, संशोधन आणि कौशल्य विकास या विषयावर सुरु होत असलेल्या एका कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी साडे दहा वाजता उद्घाटनपर भाषणात बोलणार आहेत. संध्याकाळच्या सत्रात शिक्षण मंत्री रमेश पोखरीयाल निशंक यांच्या भाषणाने चर्चासत्राचा समारोप होईल.

**<u>हरयाणा आरक्षण</u>**

हरियाणाच्या राज्यपालांनी स्थानिक नागरिकांना खासगी नोकऱ्यांमध्ये 75 टक्के आरक्षण देणाऱ्या कायद्यावर काल शिक्कामोर्तब केले. स्थानिक तरुणांना आरक्षण देण्याचे आमचे वचन आम्ही

पाळले आहे, असे हरियाणाचे उपमुख्यमंत्री दुष्यंत चौताला यांनी म्हटले आहे. 50 हजार रुपयांपर्यंत वेतन असणाऱ्या सर्व प्रकारच्या कामांमध्ये हे आरक्षण असणार आहे. अशा कर्मचाऱ्यांची यादी सादर करणे खाजगी आस्थापनांना बंधनकारक करण्यात आले असून नियमाचा भंग केल्यास दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

**<u>अग्निसुरक्षा ऑडीट</u>**

महाराष्ट्रात मुंबईतल्या सुमारे 50 टक्के रुग्णालयांमध्ये पुरेशा अग्निरोधक यंत्रणा नसल्याची कबुली नागरी विकास आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानसभेत दिली. भंडारा जिल्ह्यात रुग्णालयाला लागलेल्या आगीत10 अर्भकांना जीव गमवावा लागल्यानंतर राज्यातल्या सर्व रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षेसंबंधित ऑडीट करण्याची घोषणा करण्यात आली होती. या संदर्भात काल विधीमंडळात झालेल्या चर्चेत मुंबईतल्या 1,324 खाजगी रुग्णालयांपैकी 663 रुग्णालयांच्या आणि 38 सार्वजनिक रुग्णालयांच्या अग्निरोधक व्यवस्थेमध्ये त्रुटी आढळल्या असून त्यांना नोटीस बजावल्याचे सांगण्यात आले.

**<u>गडकरी – नाग नदी</u>**

महाराष्ट्रातल्या नाग नदीच्या प्रदूषण निर्मूलन प्रकल्पाला मान्यता मिळाल्याची माहिती काल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. 2,117 कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून नागपूरमधून वाहणारी नाग नदी आणि तिच्या उपनद्या सांडपाणी आणि औद्योगिक प्रदूषणाच्या विळख्यात सापडल्या आहेत. राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय हा प्रकल्प राबवणार आहे.

**<u>रब्बी खरेदी आढावा बैठक</u>**

आगामी रब्बी हंगामातल्या गहू खरेदीची आढावा बैठक काल अन्न आणि सार्वजनिक वितरण सचिव सुधांशू पांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. 2021 – 22 या हंगामातील गहू खरेदी आणि 2020 – 21 वर्षासाठी धान विपणन व्यवस्थेसंबंधी यावेळी चर्चा करण्यात आली. 427 लाख मेट्रिक टन गव्हाची खरेदी या हंगामात प्रस्तावित आहे. तसेच रब्बी हंगामात सुमारे 120 लाख मेट्रिक टन तांदूळ खरेदीसाठी उपलब्ध होईल, असा अंदाज आहे.

**<u>जावडेकर सिमलीपाल</u>**

सिमलीपाल व्याघ्र अभयारण्यात लागलेली आग तातडीने विझवण्याचे प्रयत्न करण्याच्या सूचना पर्यावरण मंत्री प्रकश जावडेकर यांनी दिल्या आहेत. पेट्रोलियम मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या आगीबद्दल चिंता व्यक्त केली होती.

**टीआरपी घोटाळा**

कथित टीआरपी घोटाळ्यातले आरोपी Broadcast Audience Research Council चे माजी कार्यकारी संचालक पार्थो दासगुप्ता यांना काल मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. दोन लाख रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर त्यांची सुटका करण्यात आली. दासगुप्ता 24 डिसेंबरपासून अटकेत होते.

**जपान सेन्काकू बेटे**

पूर्व चीनी समुद्रात असलेली सेन्काकू बेटे हा चीनचाच भूभाग असल्याचा चीनचा दावा जपानने फेटाळून लावला आहे. ऐतिहासिक काळापासून ही बेटे जपानचा भाग आहेत, असा दावा जपानी संरक्षण मंत्र्यांनी केला आहे. या भागातला चीनी सैन्याचा वाढता हस्तक्षेप आंतरराष्ट्रीय नियमांचा भंग आहे, असं जपानने म्हटले आहे. आम्हाला शांतता हवी असली, तरी आमच्या भूभागाचे संरक्षण करण्यास आम्ही समर्थ आहोत याचा पुनरुच्चार जपानने केला आहे.

**खेलो इंडिया हिवाळी**

जम्मू आणि काश्मीरमध्ये गुलमर्ग येथे काल संपलेल्या खेलो इंडिया हिवाळी स्पर्धांच्या दुसऱ्या टप्प्यात जम्मू काश्मीरने पदक तालिकेत पहिला क्रमांक पटकावला आहे. जम्मू काश्मीरने 11 सुवर्ण, 18 रौप्य आणि 5 कांस्य पदके मिळवली. 27 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातून सुमारे बाराशे खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते.

**स्विस बॅडमिंटन**

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धांच्या पहिल्या दिवशी मिश्र दुहेरीमध्ये काल भारताच्या सात्विकसाईराज रेन्कीरेड्डी आणि अश्विनी पोन्नपा यांनी इंडोनेशियाच्या जोडीला 21-18, 21 – 10 हरवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. भारताच्या के श्रीकान्थ, एच एस प्रणॉय, पी कश्यप, लक्ष्य सेन, सौरभ वर्मा आदींचे एकेरीचे सामने आज होणार आहेत. कोरोना संसर्गातून बरा झालेला बी साई प्रणीथही एकेरीचा आपला पहिला सामना खेळणार आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं; वारंवार आवाहन करुनही मास्क परिधान करण्याबाबत निष्काळजीपणा दिसून येत आहे. आपल्यासोबतच इतरांचीही काळजी घेणं आपल्याच हातात आहे. म्हणूनच मास्क वापरा, हात वारंवार स्वच्छ धुवा, सुरक्षित अंतर राखा आणि विश्वासार्ह बातम्यांसाठी ऐकत राहा, आकाशवाणी, नमस्कार.